समतावादी

# अण्णा भाऊ साठे

संपादक

डॉ. वळीराम गायकवाड डॉ. मारोती कसाव

डॉ. सोमनाथ कदम डॉ. रमेश लांडगे

निर्मिती प्रकाशन

२२९

समतावादी अण्णा भाऊ साठे
संपादक
डॉ. वळीराम गायकवाड डॉ. मारोती कसाव
डॉ. सोमनाथ कदम डॉ. रमेश लांडगे
Prabodhshilpi Anna Bhau
Editor : Dr. Satish Kamat/Dr. Raj Taderao

प्रकाशक
अनिल म्हमाने/प्रा. शोभा चाळके
निर्मिती प्रकाशन
८७३, क/२, सी वॉर्ड, सिद्धीश्री प्लाझा,
राजाराम रोड, कोल्हापूर- ४१६००२
मो. ०९८२२४७२१०९, ०९८९०५५४३४०
Email-anilnirmiti@gmail.com

प्रथमावृत्ती : १ ऑगस्ट, २०२१
मुखपृष्ठ : गंगाधर म्हमाने
मुद्रक : मिरर ऑफसेट, कोल्हापूर

ISBN : 978-93-87322-83-7

स्वागतमूल्य : रु. ३५०/-

(सदरील संपादित ग्रंथात व्यक्त झालेल्या विचार व मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतील असे नाही.)

अनुक्रम...


अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे अंतरंग : एक दृष्टिक्षेप
प्राचार्य डॉ. वसंत बिराजदार
समाजशास्त्रज्ञ : अण्णा भाऊ साठे
डॉ. देवानंद शिंदे
अण्णा भाऊ साठे यांची नायिकाप्रधान कादंबरी : तारा
डॉ. प्रमोद गारोडे
अण्णा भाऊंच्या माकडीचा माळ मधील संघर्षाचे 'चित्र'
डॉ. रफीक सुरज
अष्टपैलू व्यक्तिमत्व : साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे
डॉ. बळीराम गायकवाड
अण्णा भाऊंच्या कादंबरीतील स्त्री चित्रण
डॉ. अनिल फराकटे
अण्णा भाऊ साठे यांची 'अग्निदिव्य' ऐतिहासिक कादंबरी : एक अभ्मास
डॉ. शरद गायकवाड
अण्णा भाऊ साठे : उपेक्षित वंचितांचा हुंकार
डॉ. विजय कुमठेकर
अण्णा भाऊची अजरामर कादंबरी – वैजयंता
सोपान खुडे
संयुक्त महाराष्ट्राचा जागर घालणारे लोकनाट्य: देशभक्त घोटाळे
डॉ. मारोती कसाब
माणसाचं जीवन बदलणारी कादंबरी चिखलातील कमळ
डॉ. विठ्ठल भंडारे
वंचितांच्या साहित्यनिर्मितीतील अण्णा भाऊंचा विचार व आजचे वास्तव
प्रा. युवराज धसवाडीकर
मानवमुक्तीचा उध्दार : अण्णा भाऊ साठे
प्रा. डॉ. मनोहर शिरसाट
अण्णा भाऊ साठे यांचे विविध चळवळीतील योगदान
डॉ. राजेंद्र मुंबरकर
अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील मूल्याविष्कार
डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे
अण्णा भाऊ साठे आणि त्यांची 'चित्रा'
प्रा. आरती गायकवाड
अण्णा भाऊंच्या कथेतील आंबेडकरी प्रेरणेचा जातिसंघर्ष
सचिन बगाडे
अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समर्पित नेतृत्व 'फकिरा'
प्रा. शिवाजीराव देवनाळे





अण्णा भाऊ साठे : समतावादी साहित्यिक
प्रा. डॉ. रमेश लांडगे
अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील फुले–आंबेडकरांचा प्रभाव
डॉ. सोमनाथ कदम
अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यांचा परिचय
प्रकाश नाईक
साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य आणि इतिहास
डॉ. राज ताडेराव
भाषाप्रभू साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे
डॉ. विठ्ठल जंबाले
साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील तत्त्वज्ञान
डॉ. किशोर जोगदंड
पुरोगामी विचारवंत : अण्णा भाऊ साठे
डॉ. ज्ञानोबा कदम
अण्णा भाऊ साठे आणि त्यांची शाहिरी
डॉ. धनंजय मोगले
अण्णा भाऊ साठे आणि त्यांचे तळागाळातील समाजासाठीचे लेखन
डॉ. कमलाकर घोलप
अण्णा भाऊ साठे : सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय विचार
दत्तात्रय साठे
अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे विशेष
सुरेखा आगळे
अण्णा भाऊंची संघर्ष कादंवरी
प्रा. व्ही. सी. बेटकर
अण्णा भाऊ साठे जीवन, साहित्य आणि कार्य
पपीता कांबळे
अण्णा भाऊ साठे यांचे दलित साहित्य व आंबेडकरी चळवळीतील सामाजिक योगदान
प्रा. दिपाली वाघमारे
लोकशाहीर अण्णा भाऊ साठे एक अजरामर साहित्यिक : एक अभ्यास
प्रा. दशरथ रसाळ
अण्णा भाऊ साठे : जीवन साहित्य आणि कार्य
अनिल जाधव
अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील फुले– आंबेडकरांचा प्रभाव
प्रा. सुचिता गायकवाड

# मानवमुक्तीचा उध्दार : अण्णा भाऊ साठे

प्रा. डॉ. मनोहर शिरसाट, बीड

साहित्ससम्राट अण्णा भाऊ साठे यांनी मराठी साहित्यामध्ये अभूतपूर्व असे योगदान दिले आहे. मराठी साहित्यामध्ये आजवर न आलेला आशय अण्णाभाऊंच्या साहित्यकृतीमधून अविष्कृत झाला आहे. त्या आशयाने संबंध मराठी साहित्याचे विश्व हादरुन टाकले आहे. अर्थात प्रस्थापित समाजव्यवस्थेने दडपून टाकलेल्या आणि अमानवीय वर्तन करणाऱ्या व्यवस्थेला विरुद्ध संघर्ष करुन मुक्यांना नायकत्व देण्याचे कर्तुत्व अण्णा भाऊंच्या साहित्याने केले आहे. माणसांना नाकारणाऱ्या व्यवस्थेला सुरुंग लावला आहे. गावकुसाबाहेरील जगणं, तेथील माणसं हे 'माणूस' म्हणून जगण्यास सिद्ध आहेत म्हणून प्रथमतः त्यांचे माणूसपण त्यांना बहाल केले पाहिजे, त्यांना प्रतिष्ठित केले पाहिजे हा मानमुक्तीचा उध्दार अण्णा भाऊ आपल्या साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करतात.

समतेचा विचार प्रज्वलित करुन विषमतेविरुध्द एल्गार पुकारणारे अण्णा भाऊंचे विचार हे त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून अविष्कृत होताना दिसतात. समाजामध्ये असणारी जातवर्चस्व आणि श्रेष्ठ कनिष्टत्वाच्या भावनेतून आलेला मानवी वर्तन आणि व्यवहार हा पाडावी आणि क्रूर पध्दतीचा असल्याचे अण्णा भाऊ जेव्हा पाहतात त्यावेळी ते अस्वस्थ होतात. आणि या संपूर्ण व्यवस्थेलाच हादरे देऊन बुध्दाच्या करुणेचा आणि मानवतेचा विचार ते आपल्या सबंध साहित्यामधून प्रृस्तुतकरुन समाजाला दिशादिग्दर्शन करताना पहावयास मिळतात. समाजपरिवर्तनाचे एक हास्य म्हणून अण्णा भाऊ साहित्याचा अत्यंत प्रभावी पध्दतीने वापर करताना दिसतात. कारण अण्णा भाऊ हे कार्यकर्ते लेखक आहेत, त्यामुळे त्यांना इथला माणूस आणि त्याचे सामाकि प्रश्न अधिक महत्त्वाचे वाटतात. हया प्रश्नांच्या मुळाशी ते जाऊ पाहतात. प्रश्नांची उकल करु पाहतात, त्यासाठी म्हणून ते साहित्याचा वापर करतात, अण्णा भाऊंनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ, त्यांचे कर्तृत्व आणि विचार जवळून पाहिले



होते. त्यामुळे त्यांच्यावर या सर्व बाबींचा मोठा प्रभाव पडलेला होता. म्हणूनच त्यांच्या साहित्यातून समताधिष्ठित समाजव्यवस्थेचा विचार प्रतिबिंबित होताना दिसतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रभावित होऊन जन्मा अनिष्ठ रुढी, परंपरा आणि विषमतेच्या मुळावर घाव घालण्याचे आवाहन करताना अण्णाभाऊ म्हणतात.

'जग बदल घालूनी घाव, सांगूनी गेले मज भीमराव' या क्रांतीगीतमधून त्यांची साहित्यविषयक दृष्टीही अधिक स्पष्ट होते. अण्णा भाऊंच्या साहित्यातील नायिका हया प्रचंड करारी बाण्याच्या आणि स्वाभिमानी आहेत. समाजासमोर एक आदर्श म्हणून हया नायिका अण्णा भाऊ उभ्या करतात. त्या दरिद्री आहेत, मात्र स्वतःच्या चारित्र्याला जपणाऱ्या आहेत. पारंपाकि पध्दतीच्या आणि तसा विचार करणाऱ्या महिलांना अण्णा भाऊ आपल्या साहित्यातून नायकत्व देत नाहीत. स्त्रियांनी सर्व अन्याय–अत्याचार हे नशिबाचा भोग म्हणून सहन करावे, याला फाटा देत आक्रमक नायिका उभ्या केल्या आहेत. अर्थात त्यांनी स्त्रीचित्रणाची परंपरागत असणारी अशी शैली साफ नाकारुन नवा विचार आणि कृती करणारी शैली आपल्या साहित्यातून मांडली. अर्थात एका दृष्टीने अण्णा भाऊंनी स्त्रियांचा सन्मान करीत त्यांना सर्वप्रथम 'माणूस' म्हणून प्रतिष्ठित करण्याचे अत्यंत महत्त्वाचे असे काम केले आहे. हे काम मानवतेचे आहे. वैर मधील गुणा, कुरुप मधील हरणा, त्या स्वतःचे शील जपण्यासाठी विद्रोह करतात. एवढेच नाही तर अन्यास करणाऱ्यांना मारुन टाकण्याची हिम्मत दाखवतात. वारणेच्या खोऱ्यात मधील मंगला, माकडीचा माळ मधील दुर्गा, चंदन मधील चंदन, चित्रामधील चित्रा, आवडी हया नायिका अन्यायाविरुद्ध बंड करतात. पारंपारिक स्त्रियांसारखा अन्याय सहन करणाऱ्या नाहीत, हे प्रामुख्याने निदर्शनास येते.

लेखकांची लेखनविषयक भूमिका कशी असली पाहिजे, त्यांनी काम लिहिले पाहिजे, कोणती भूमिका घेतली पाहिजे, यासंदर्भात दिनांक २ मार्च १९५८ मध्ये झालेला अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनाच्या उदघाटनपर भाषणात जी भूमिका अण्णा भाऊंनी मांडली आहे, ती अत्यंत महत्त्वाची आणि दिशादर्शक अशीच आहे. त्यामध्ये अण्णाभाऊ म्हणतात, एका झाडाखाली तीन दगडांची चूल करुन, मडक्यात अन्न शिजवून, दोन मूलं आणि बायको यांना जगविणारा हा दलित वरवर कंगाल दिसत असला तरी त्याची संसार करण्याची